उपेंद्र गावकर समाजातून निलंबित

देवानंद नाईक यांची माहिती : सोबत राहणाऱ्यांनी विचार करावा

पणजी : पुढारी वृत्तसेवा

उपेंद्र गावकर यांनी समाजाच्या विरोधात काम केल्यामुळे व पैशाची अफरातफर केल्यामुळे त्यांना गोमंतक भंडारी समाजातून निलंबित करण्यात आलेले आहे.

गावकर हे आपल्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करून तालुका समित्या काढत आहेत. लोकांनी समाजाच्या विरोधात काम करणाऱ्या गावकर यांच्या सोबत कितपत राहावे, याचा विचार करावा, अशी प्रतिक्रिया गोमंतक भंडारी समाजाचे अध्यक्ष देवानंद नाईक यांनी दिली.

पणजी : पत्रकार परिषदेत बोलताना अध्यक्ष देवानंद नाईक. बाजूला अन्य पदाधिकारी.

बुधवारी पणजी येथील गोमंतक भंडारी समाजाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांनी उपेंद्र गावकर यांच्या समितीबद्दल नाईक यांना विचारले असता नाईक म्हणाले, गोमंतक भंडारी समाजाच्या घटनेत समाजाविरोधात जो काम करतो त्याला समाजातून काढून टाकण्याची तरतूद आहे. त्यानुसार उपेंद्र गावकर यांना समाजातून काढून टाकलेले आहेत. ते लोकांची दिशाभूल करत आहेत. पर्यायी समित्या स्थापन करत आहेत. हे सर्व बेकायदेशीर आहे, या समितीवर जे जातात त्यांनी याबाबत गंभीरपणे विचार करावा, असे नाईक म्हणाले.

२५० विद्यार्थ्यांना देणार शिष्यवृत्ती ..

गोमंतक भंडारी समाजातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही २९ जून रोजी सुमारे २५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. त्याच सोबत डॉक्टर, अभियो झालेल्यांचा गौरव केला जाणार आहे. हा कार्यक्रम मापसा येथील प्रगती सभागृहामध्ये सकाळी ९.३० वाजल्यापासून होईल. समाजातील ज्या विद्यार्थ्यांनी १० व १२ वीत ७५ टक्के गुण मिळवलेत त्यांना व पदवीमध्ये ७० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनी पणजी येथील कार्यालयात व तालुका कार्यालयात उपलब्ध अर्ज १६ जून पर्यंत भरून द्यावेत. असे आवाहन देवानंद नाईक यांनी केले. यावेळी माजी अध्यक्ष अशोक नाईक,मंगलदास नाईक आदी उपस्थित होते.

पाच अभयारण्य वन्यजीव व्यवस्थापन योजनेला मंजुरी

पणजी : पुढारी वृत्तसेवा

वन्यजीव अधिवासांचे संरक्षण करण्यासाठी आणि मानव-प्राणी संघर्ष कमी करण्यासाठी, गोवा राज्य वन्यजीव मंडळाने पाच वन्यजीव अभयारण्ये आणि एका पक्षी अभयारण्यासाठी राज्य वन्यजीव व्यवस्थापन योजनांना मान्यता दिली आहे. वन अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, नुकत्याच झालेल्या बैठकीत, राज्य वन्यजीव मंडळाने बोंडला, नेत्रावळी, म्हादई, खोतीगाव आणि भगवान महावीर वन्यजीव अभयारण्य मोले तसेच डॉ. सलीम अली राष्ट्रीय पक्षी उद्यान चोडण या अभयारण्यासाठी १० वर्षांच्या व्यवस्थापन योजनांना मान्यता दिली.

या संवर्धन योजनांचा उद्देश शाश्वत, प्राणी-अनुकूल पद्धतींचा वापर करून जैवविविधता आणि अधिवास संरक्षण वाढवणे आहे. या योजनांमध्ये नैसर्गिक वनस्पतींचे जतन, वन्यजीवांसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे, प्राण्यांची आरोग्यसेवा, माती संवर्धन, शिकार विरोधी उपाययोजना, धोक्यात असलेल्या प्रजातींचे संरक्षण, पर्यावरणीय पर्यटन विकास आणि अभयारण्याच्या मांचे निर्बंध यांचा समावेश आहे, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
ई-निविदा मागविणारी सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने क्षेत्रिय विद्युत अभियंता, शिरवाड, कारवार खालील कामासाठी ई-निविदा मागवित आहेत:
कोकण रेल्वेच्या कारवार भागातील सँडर आणि वायपर कामांसाठी आणि संबंधित कामांसाठी वेर्णा, मडगाव आणि सुरथकल येथे अकुशल मनुष्यबळाचे आउटसोर्सिंग साठी अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. (**निविदा सं.** केआर-केडब्ल्यू-ईएल-टी-7-2025 **दिनांक:** 29/05/2025). **कामाचे मूल्य:** ₹ 19.96 लाख (जीएसटी वगळता). **बोली सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:** 13/06/2025 रोजी 15:00 वा. पर्यंत.
अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या.

स्टार्ट-अपमध्ये सहा पट वाढ

राज्यात मागील चार वर्षांत ५ हजार नोकऱ्यांची निर्मिती

पणजी : पुढारी वृत्तसेवा

गोव्यातील स्टार्ट-अप इकोसिस्टममधील उद्योगाचा वाढीचा वेग बराच वर गेला आहे. गेल्या चार वर्षांत राज्यात पाच पटीने यात वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये युनिटची संख्या ११० होती ती आता ६१५ झाली असून प्रमाणित गोव्यातील स्टार्ट-अप सध्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) मध्ये नोंदणीकृत आहेत.

शिवाय, गोवा स्टार्ट-अप धोरण, २०२१ अंतर्गत ५०० नवीन स्टार्ट-अप निर्माण करण्याचे उद्दिष्ट राज्याने साध्य केले आहे, ज्याचा कार्यकाळ यावर्षी ऑगस्टमध्ये संपत आहे. प्रत्येक कंपनीत सरासरी १० कर्मचारी असल्याने, नव्याने स्थापन झालेल्या स्टार्ट अप्सनी ५,००० नोकऱ्या निर्माण केल्या आहेत.

१० भूखंडांचे वाटप...

आयटी विभाग तुये येथील इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर(ईएमसी) मध्ये एक डिझाइन सेंटर स्थापन करत आहे. हे सेंटर काम करेल. ईएमसीमधील १७ औद्योगिक भूखंडांपैकी सात भूखंडांचे आत्तापर्यंत वाटप करण्यात आले आहे. सूक्ष्म कृषी चाचणी क्षेत्रात, ज्यामध्ये ३३ भूखंड आहेत आणि लहान आणि मध्यम उद्योगांना आधार देण्यासाठी ईएमसी धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे, १० भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. मायक्रो झोनमध्ये १३ भूखंडांचे वाटप शिल्लक आहेत.

३ वर्षांत १ हजार स्टार्टअप

नवीन स्टार्ट-अप धोरण, जे तयार होत आहे, त्यात राज्याला भारताचे सर्जनशील राजधानी बनवण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल अशी अपेक्षा आहे. या धोरणात तीन वर्षांच्या कालावधीत १,००० नवीन स्टार्ट-अप निर्मिती आणि १०,००० नोकर्या निर्माण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या धोरणाचे उद्दिष्ट काही प्रमुख आयटी कंपन्यांना आकर्षित करणे देखील असेल जे राज्याच्या संकटग्रस्त परिसंस्थेच्या उभारणीत मदत करू शकतील.

स्टार्ट-अप प्रमोशन सेलमधील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अलीकडच्या काळात सुरू झालेल्या २५ टक्के स्टार्ट-अप्स माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि आयटी सक्षम सेवा उद्योग क्षेत्रात आहेत, तर १८ टक्के अन्न आणि पेय पदार्थ क्षेत्रात आहेत, १५ टक्के पर्यटन-आधारित आहेत, १२ टक्के वैद्यकीय तंत्रज्ञानात आहेत आणि उर्वरित ३० टक्के मिश्र क्षेत्रात काम करणारे आहेत.

गोव्याला आयटी हब बनवण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना बळ देणार्या स्टार्ट-अप्समध्ये बरीच वाढ होत आहे. एक वायरलेस, स्मार्ट ॲक्सेस कंट्रोल प्लॅटफॉर्म आहे, त्याला १० लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले होते. गुंतवणूकदारांकडून ५० कोटी रुपये गुंतवण्यात आले. एका ई-बाईक कंपनीने ४५ कोटी रुपये गुंतवले आहेत.

पायलटाच्या कुटुंबीयांना ४१.६६ लाख रु. देण्याचा आदेश

सासष्टी : पुढारी वृत्तसेवा

दांडेवाडो - चिंचोळणे टेम्पो ट्रॅव्हल्हर व येलो ब्लॅक मोटारसायकल पायलट यांच्यात टक्कर होऊन झालेल्या अपघातात मरण पावलेले मोटारसायकल पायलट अब्दुल मजीद मुल्ला (४५) याच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई म्हणून ४१.६६ लाख रुपये इन्शुरन्स कंपनीने द्यावेत, असा निवाडा येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश पूजा चंद्रकांत कवळेकर यांनी दिला आहे. इन्शुरन्स कंपनीने वाहन अपघातात बळी गेलेले अब्दुल मजीद मुल्ला यांच्या पत्नी नूरजहाँन मुल्ला (४०) व मुलगा नईम अब्दुल मुल्ला (२०) यांना नुकसान भरपाईची रक्कम द्यावी, असे आदेशात म्हटले आहे.

कुळेतील भात शेतीला पावसाचा फटका

धारबांदोडा : अवकाळी पावसामुळे मेटावाडा कुळे येथील सुमारे सात हेक्टर भात शेतीचे नुकसान झाले असून याचा फटका ३५ शेतकऱ्यांना बसलेला आहे. बुधवारी धारबांदोडा कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांनी कुळे येथे उपस्थिती लावून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे अर्ज तात्काळ भरून घेतले आहेत.

राक्षसमळ्ळीकेश्वर शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नामदेव म्हार्दोळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार एकूण ३५ शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झाले आहे. यात सुमारे आठ लाख रुपयांचा फटका त्यांना बसलेला आहे. गेल्या आठवड्यात भात कापणीला शुभारंभ करण्यात आला होता, त्यासाठी कापणी मशीनही मागविले होते.

मानवाधिकार आयोगाकडून 'बीडिओं'ना नोटीस

पणजी : सांताक्रूझ पंचायत क्षेत्रातील कचरा वेचणाऱ्या कामगारांच्या वाईट परिस्थितीबद्दल तक्रारी आल्यानंतर गोवा मानवाधिकार आयोगाने तिसवाडी गट विकास अधिकारी (ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिस आणि सांताक्रूझ पंचायतीच्या सचिवांना नोटीस बजावल्या आहेत. पुरेशा सुरक्षा उपकरणांशिवाय कामगारांना अस्वच्छ वातावरणात काम करण्यास भाग पाडले जाते, असे सांताक्रूझ येथील इनासिओ परेरा यांनी छायाचित्रित पुरावे देऊन दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. २० जून रोजी सुनावणी होणार आहे, जिथे अधिकाऱ्यांना उपस्थित राहून उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे.

सार्वजनिक सुविधांमध्ये एआयचा वापर : मंत्री राणे

पणजी : पुढारी वृतसेवा

विश्वजित राणे

जिनेव्हा येथील ७८ व्या जागतिक आरोग्य सभेत गोव्याचे प्रतिनिधित्व डॉ केदार नाईक यांनी केल्याची माहिती आरोग्यमंत्री डॉ. विश्वजित राणे यांनी दिली. काही महिन्यांतच, आम्ही १९ सार्वजनिक आरोग्य सुविधांमध्ये एआयचा वापर करत असल्याचेही मंत्री राणे म्हणाले.

मंत्री राणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गोव्याच्या पथकाने नवोपक्रम, समता आणि धोरणात्मक भागीदारीद्वारे गोवा फुफ्फुसांच्या कर्करोगाच्या काळजीमध्ये कसे आघाडीवर आहे हे दाखविण्याचा मान मिळवला.

ते म्हणाले, सर्व नागरिकांसाठी मोफत सीटी स्कॅन, निदान वेळ कमी करण्यासाठी रुग्ण नेव्हिगेशन सिस्टम, नियमित एक्स-रे द्वारे प्रारंभिक टप्प्यातील फुफ्फुसांच्या कर्करोगाचे निदान, गोवा वैद्यकीय महाविद्यालय आणि ऑन्कोलॉजी विभागाच्या सहकार्याने मोबाईल स्क्रीनिंग व्हॅन कार्यान्वित केल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.

मल्लिकार्जुन खर्गे यांचा गोवा दौरा रद्द

पणजी : काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे गोवा दौऱ्यावर येणार होते. मात्र, ऐनवेळी खर्गे यांचा गोवा दौरा रद्द झाला आहे. त्यावरून भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गिरिराज पै वेर्णेकर यांनी जोरदार टीका केली आहे. वेर्णेकर म्हणाले, खर्गे आल्यानंतर कार्यकर्त्यांची सभा आयोजित करण्यात येणार होती, त्यात गर्दी जमणार नसल्याचे कळल्यानेच त्यांची सभा रद्द करण्यात आली आहे. काँग्रेसकडे सध्या कार्यकर्ते नाहीत, जे नेते आहेत ते पक्षासाठी काम करण्यास तयार नाहीत, गोव्यात काँग्रेस पक्ष विस्कळीत झालेला आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

बार्देशमधील कचऱ्याचे ढीग वेळीच उचला!

उपजिल्हाधिकाऱ्यांचे पालिका, पंचायतींना आदेश

म्हापसा : पुढारी वृत्तसेवा

पावसाळ्यात म्हापसा शहरासह बार्देश तालुक्यातील गटारे व नाले तुंबणार नाहीत याची काळजी घ्यावी, उपसानंतर गटारांच्या शेजारी टाकलेला कचरा तसेच म्हापसा शहरातील जागोजागी पडलेले कचऱ्याचे ढीग वेळीच उचलावेत, असे निर्देश उपजिल्हाधिकारी वर्षा परब व नारायण गाड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उपजिल्हाधिकाऱ्यांनी मान्सूनपूर्व कामांची आढावा बैठक नुकतीच घेतली. या बैठकीत वीज खात्याचे अधिकारी वगळता इतर विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते.

दि. २० मे रोजी पडलेल्या अवकाळी पावसामुळे म्हापसा शहरासह बार्देश तालुक्यात विविध ठिकाणी पुरसदृश्य स्थिती निर्माण झाली होती.

या बैठकीत यावर चर्चा झाली. जलस्रोत, साबांखा व म्हापसा पालिका यांना म्हापशातील नाले आणि गटारे तुंबणार नाहीत, याची काळजी घेणे, उघड्यावर टाकलेल्या कचर्याची उकल पालिकेने त्वरीत करावी, गटारे साफ करून टाकलेला गाळ उचलावा, जेणेकरून पावसाच्या पाण्यामुळे हा कचरा गटारांमध्ये जाणार नाही. गावसावाडा-पेडे दरम्यानच्या सर्व्हिस रोडसह अस्नोडा, पर्रा, गिरी, पर्वरी व तालुक्यातील ज्या ज्या भागात तुंबणाऱ्या पाण्याच्या विसर्गावर तोडगा काढावा व पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी.

मोबाईल चोरी प्रकरणी संशयित जाळ्यात

साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त : पेडणे पोलिसांची कारवाई

पेडणे : पुढारी वृत्तसेवा

पेडणे पोलिसांनी साडेतीन लाख रुपये किंमतीच्या मोबाईल चोरीप्रकरणी पश्चिम बंगाल येथील संशयिताला ताब्यात घेऊन त्याच्याकडून मोबाईल जप्त केले.

पेडणे पोलिस निरीक्षक सचिन लोकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मे २०२५ रोजी अनिल राठोड यांनी पेडणे पोलिस स्थानकात मोबाईल चोरल्याची तक्रार दिली होती. तक्रारीवरून पेडणे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

याबाबत पेडणे पोलिसांनी एक पथक तयार केले.

या पथकात पोलिस अधिकारी साहिल एस. नाईक, शशांक साखळकर, प्रज्योत मयेकर, कृष्णा वेळीप यांचा समावेश होता. तांत्रिक देखरेखीच्या आधारे आणि एसपी (उत्तर) सीएमसी सेलच्या मदतीने, आरोपी सैदुल मुलगा लतीब मंडल, (वय २४) सध्या रा. कळंगुट (दिनाजपूर, पश्चिम बंगाल) याला कोलवाळ येथे ताब्यात घेण्यात आले. त्याच्याजवळून विविध प्रकारचे मोबाईल, स्मार्ट वॉच सापडले. या सर्व वस्तूंची किंमत अंदाजे ३ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पेडणे पोलिस ठाण्याचे निरीक्षक सचिन लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक साहिल एस. नाईक हे पेडणे पोलिस उपअधक्षक सलीम शेख, आणि उत्तर गोवा पोलिस अधीक्षक राहुल गुप्ता त्यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

पेडणे : जप्त केलेले मोबाईलच्या मद्देमालासह पोलिस उपनिरीक्षक सलीम शेख **व अन्य पोलिस कर्मचारी.**

निधनवार्ता

महादेव साळगावकर

साळ : पिस्तेवाडा - नानोडा, डिचोली येथील श्री महादेव शिवराम साळगावकर (वय ७०) यांचे बुधवार, दि. २८ रोजी पहाटे ६.१५ वा. राहत्या घरी निधन झाले. त्याच दिवशी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व मुलगी असा परिवार आहे. ते एक उत्तम कलाकार होते. ते चित्रकार शिवराम (शिवम) साळगावकर तसेच श्रद्धा साळगावकर यांचे वडील होत.

ट्रेड विंग्ज लिमिटेड

सीआयएन : L63040GA1949PLC000168
नोंदणीकृत कार्यालय पत्ता : १ला मजल, नाईक बिल्डिंग, डॉन बॉस्को हायस्कूल समोर, महात्मा गांधी रोड, पणजी, गोवा -४०३ ००१
टेलिफोन - ९१-८३२२२२४५७६, **ई-मेल :** companysecy@twltravel.com, **वेबसाईट**- www.tradewings.in

३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी वार्षीक लेखापरिक्षीत स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड आर्थिक रिझल्ट्सचा अंश

(रूपये लाखात दर शेअर मूल्य वगळता)

(अलेखापरिक्षीत)	स्टॅण्ड अलोन				कन्सोलेटेड	
	तिमाही अखेर		वर्ष अखेर		वर्ष अखेर	
	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत)	३१.०३.२०२४ (लेखापरिक्षीत)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत)	३१.०३.२०२४ (लेखापरिक्षीत)	३१.०३.२०२५ (लेखापरिक्षीत)	३१.०३.२०२४ (लेखापरिक्षीत)
व्यवहारांपासूनची एकूण मिळकत	५२२६.००	५१५९.१८	२१२४४.४५	२०८३४.४७	२४९३९.६२	२४२४२.४६
(करपूर्व कालावधीसाठी, अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तू) निव्वळ नफा/(तोटा)	१२२.८८	६५.६२	६०.८०	७.८६	३६१.५२	३५६.९७
करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तूंनंतर)	१२२.८८	६५.६२	६०.८०	७.८६	३६१.५२	३५६.९७
करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य वस्तूंनंतर)	११९.२९	६३.५३	५७.२१	५.७६	३८०.३४	३११.१७
कालावधीसाठी एकूण व्यापक मिळकत ((करोत्तर)कालावधीसाठीचा नफा आणि इतर व्यापक मिळकत (करोत्तर)सहीत)	१११.१३	६२.६७	४९.०५	४.९०	३७७.६७	३१६.८६
अदा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रू.१०)	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००	३००.००
मागील वर्षाच्या ऑडीटेड ताळेबंदमध्ये दाखवण्यात आलेले रिझर्व्हस (रिव्हॅल्यूएशन रिझर्व्हस वगळून)	०.००	०.००	-१५७.१६	-२०७.८२	-१४२६.७७	-१८०६.०५
दर शेअर मिळकत (असामान्य वस्तूंपूर्वी) (दर्शनी मूल्य रू.१०/- प्रत्येकी) (चालू व्यवहारांसाठी)						
बेसिक	३.९८	२.१२	१.९१	०.१९	१२.६८	१०.३७
डायल्युटेड	३.९८	२.१२	१.९१	०.१९	१२.६८	१०.३७
दर शेअर मिळकत (असामान्य वस्तूंनंतर) (दर्शनी मूल्य रू.१०/- प्रत्येकी) (चालू व्यवहारांसाठी)						
बेसिक	३.९८	२.१२	१.९१	०.१९	१२.६८	१०.३७
डायल्युटेड	३.९८	२.१२	१.९१	०.१९	१२.६८	१०.३७

नोट : १) उपरोक्त ३१ मार्च २०२५ रोजी वर्ष अखेर संपलेल्या आणि तिमाहीसाठी सेबीच्या नियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये दाखल केलेल्या वार्षिक स्वतंत्र आणि एकत्रित आर्थिक निकालांच्या तपशीलाचा उतारा आहे (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५. वार्षिक स्टँडअलोन आणि एकत्रित आर्थिक निकालाचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट्.लीशळपवळर.लो आणि कंपनीच्या्.ीरवशुळपसी.ळप वेबसाइटवर उपलब्ध आहे. २) वरील परिणामांचे लेखा समितीकडून परिक्षण झाले आहे आणि संचालक मंडळाने मे २८,२०२५ रोजी झालेल्या बैठकगीत ते रेकॉर्डवर घेतले. चालू तिमाही आणि आर्थिक वर्षाच्या परिणामांचे कंपनीच्या वैधानिक लेखा परिक्षकांकडून लेखापरिक्षण झाले आहे. ३) संपूर्णपणे स्वमालकीच्या दुय्यम कंपनीत- ट्रेड विंग्ज हॉटेल्स लि. मध्ये कोणत्याही प्रकारची आणिबाणीची गुंतवणूकीची तरतूद आर्थिक वर्षात करण्यात आलेली नाही, कारण व्यवस्थापनाला दुय्यम कंपनीच्या चालू व्यवहारांच्या परिणामांत सकारात्मक प्रवाहाची अपेक्षा आहे. ४) ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठीची आकडेवारी कंपनीच्या वैधानिक लेखापालांनी लेखापरिक्षण केले आहे. वैधानिक लेखापालांचा अहवाल अपात्र आहे. ३१ मार्च २०२५आणि ३१ मार्च २०२४रोजी संपलेल्या तिमाहीची आकडेवारी ही संपूर्ण आर्थिक वर्षाची ऑडीटेड आकडेवारी आतापर्यंतच्या आकडेवारीमधील बॅलन्सिंग आकडेवारी आहे. ५) हे आर्थिक परिणाम हे भारतीय अकाउंटींग स्टँडर्ड्स (इंड-एएस) नुसार जे कंपनी कायदा,२०१३च्या कलम १३३ अंतर्गत आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या संबंधित नियमांतर्गत नमूद करण्यात आले आहेत, आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट, २०१५ लिस्टींग रेग्युलेशन्स) च्या नियम ३३ नुसार तसेच इंड-एएस१०८, ऑपरेटींग सेग्मेंट्स, तयार करण्यात आले आहेत, सेग्मेंट माहिती कंपनीच्या लेखापरिक्षित स्टँडअलोन आणि कन्सोलिडेटेड आर्थिक परिणामांत दिली आहे. ६) पूर्वीच्या कालावधीची आकडेवारी या कालावधीचे वर्गीकरण निश्चित करण्यासाठी गरज भासेल तेथे पुनर्गठीत/पुनर्वर्गीकृत करण्यात आली आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८ मे २०२५

ट्रेड विंग लि. साठी
स्वाक्षरी/-
डॉ. शैलेंद्र पी. मित्तल, व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन :००२२१६६१